महत्त्वाचे

दोन अल्पवयीन मुलींचे अपहरण

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– शहरात दोन वेगवेगळ्या ठिकाणी अल्पवयीन मुलींच्या अपहरणाच्या घटना घडल्या आहेत. याप्रकरणी तोफखाना व कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले असून पोलीस तपास सुरू आहे. एका युवतीने तोफखाना पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांची बहीण (वय १६) २० जून रोजी कोणालाही न सांगता घरातून निघून गेली. संपूर्ण परिसरात तसेच नातेवाइकांकडे शोध घेतल्यानंतरही ती मिळून आली नाही. यापूर्वीही ती दोन वेळा बेपत्ता झाली होती आणि पोलिसांनी सुखरूप शोधून दिले होते. मात्र यावेळी अज्ञात व्यक्तीने फूस लावून तिचे अपहरण केल्याचा संशय फिर्यादीने व्यक्त केला आहे. दुसऱ्या घटनेत, केडगावातील एका ३२ वर्षीय महिलेने कोतवाली पोलिसांत फिर्याद दाखल केली आहे की, १८ जून रोजी दुपारी १२ ते संध्याकाळी ६ च्या दरम्यान त्यांची मुलगी (वय १७) ही केडगाव येथून बेपत्ता झाली आहे. मुलगी कोणास काही न सांगता घरातून निघून गेली असून ती अद्यापपर्यंत परतलेली नाही. तीला अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

सारसनगरमध्ये दिवसा घरफोडी

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– सारसनगर परिसरात भरदिवसा बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी चांदीचे व सोन्याचे दागिने चोरी केल्याची घटना सोमवारी (२३ जून) घडली. याप्रकरणी स्नेहल संतोष कुलकर्णी (वय ३७, रा. उषा प्राईड अपार्टमेंट) यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी कुलकर्णी या सोमवारी सकाळी ७ वाजता घर बंद करून बाहेर गेल्या. दुपारी २.३० वाजता परत आल्यानंतर त्यांच्या घराचा मागील दरवाजा व कुलूप तोडलेले आढळले. घरातील कपाट उचकून पाहता, त्यामधून चांदीचे ७ ग्रॅम वजनाचे पैजण, चांदीचा ४ ग्रॅम वजनाचा मोदक, चांदीचा १० ग्रॅम वजनाचा छल्ला, चांदीची १५ ग्रॅम वजनाची चैन, सोन्याची नथ असा एकूण सुमारे ५ हजार ७०० रूपयांचा ऐवज चोरीस गेला आहे. पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरूध्द गुन्हा दाखल केला असून तपास पोलीस अंमलदार नंदकुमार पठारे करीत आहेत.

अपघातात अल्पवयीन मुलाचा मृत्यू

अहिल्यानगर (प्रतिनिधी) – शहरातील इम्पेरियन चौक ब्रीजवर रस्ता अपघातात गंभीर जखमी झालेल्या अल्पवयीन मुलाचा (वय १६) उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. नमोह धनेश लोढा (वय १६, रा. माणिकनगर, अहिल्यानगर) असे मयत अल्पवयीन मुलाचे नाव आहे. २१ जून रोजी नमोह लोढा हा मुलाचा इम्पेरियन चौक ब्रीजवर रस्ता अपघातात झाला होता. त्या गंभीर जखमी झालेल्या नमोह याला तातडीने खासगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान २३ जून रोजी सकाळी १०:४३ वाजता त्याचा मृत्यू झाला. याबाबतची माहिती रूग्णालय प्रशासनाने कोतवाली पोलिसांना दिली असून पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार दाणी करीत आहेत.

महिलेची इंस्टाग्रामवर बदनामी

अहिल्यानगर (प्रतिनिधी) – इंस्टाग्रामवर अनोळखी व्यक्तीसोबतचे फोटो पोस्ट करून अश्लिल व बदनामीकारक मजकूर टाकत एक महिलेला लज्जा वाटेल असे कृत्य करणाऱ्या कोपरगावच्या युवकावर एमआयडीसी पोलीस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संदीप अशोक पवार (वय १९ रा. वंजार गल्ली, कोपरगाव) असे त्याचे नाव आहे. एमआयडीसी परिसरात राहणाऱ्या ३५ वर्षीय महिलेने या प्रकरणी फिर्याद दिली आहे. पीडितेच्या फिर्यादीनुसार, संदीप पवार याने २२ जून रोजी सकाळी ९:३० च्या सुमारास इंस्टाग्रामवरील आयडीवरून फिर्यादीचे इतर पुरूषांसोबतचे फोटो पोस्ट करून, त्यावर आक्षेपार्ह मजकूर लिहिला. या प्रकारामुळे फिर्यादीस लज्जा उत्पन्न झाली असून तिची बदनामी होण्याचा उद्देश असल्याचे स्पष्ट होते. तसेच संशयित आरोपीने वारंवार पाठलाग करून तिचा मानसिक छळ केला असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

दुचाकी चोरणारा अटकेत

अहिल्यानगर (प्रतिनिधी) – एमआयडीसी औद्योगिक वसाहतीतील एक्साईड कंपनीच्या पार्किंगमधून दुचाकी चोरून नेणाऱ्या चोरट्याला एमआयडीसी पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे. कृष्णा रवींद्र निबे (वय १९, रा. भगवतीपूर कोल्हार, ता. जि. राहाता) असे अटकेत आलेल्या संशयित आरोपीचे नाव असून त्याच्याकडून चोरीस गेलेली दुचाकी जप्त करण्यात आली आहे. ही घटना २२ जून रोजी दुपारी ३ ते रात्री ११ च्या दरम्यान घडली होती. याबाबत विलास बबन तुपे (रा. शिंगवे नाईक, ता. अहिल्यानगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. सपोनि माणिक चौधरी यांच्या नेतृत्वाखालील पथकाने तांत्रिक विश्लेषणासह मिळालेल्या माहितीनुसार संशयित आरोपी कृष्णा निबे हा साईबन रस्ता परिसरात येणार असल्याचे कळताच पोलिसांनी सापळा रचत त्यास दुचाकीसह ताब्यात घेतले. अंमलदार राकेश खेडकर, सचिन आडबल, राजु सुद्रीक, रोहोकले, किशोर जाधव, नागरे, रोहोकले व मोबाईल सेलचे राहुल गुंड यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

जिल्हा वॉटर पोलो संघाची निवड

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– जिल्हा वॉटर पोलो संघाची नुकतीच निवड करण्यात आली आहे. अमरावती येथे होणाऱ्या कुमार राज्य वॉटर पोलो स्पर्धेसाठी हा संघ खेळणार आहे. लवकरच अमरावती येथे होत असलेल्या राज्य वॉटर पोलो स्पर्धेसाठी विखे पाटील सैनिक स्कूल जलतरण तलाव लोणी येथे जिल्हा निवड चाचणी स्पर्धा पार पडली. या स्पर्धेतून संघाची निवड सचिव रावसाहेब बाबर यांनी जाहीर केली आहे. निवड समितीमध्ये क्षितिज बाबर, प्रणित ढोकळे, ओंकार ढमाले यांचा समावेश होता. जिल्हा वॉटर पोलो संघामध्ये कर्णधार आर्यन धायतडक, सार्थक सरोदे, सार्थक इंडायक, तेजस पवार, गौरंग गवानकर, राजवर्धन पाटील, विर उनवणे, रणविजय घोरपडे, आर्कम शेख, कौस्तुभ चिवटे, प्रयागराज पवार, अर्णव पळशीकर, श्रेय गांधी व राखिव खेळाडू म्हणून जीत लाड, साईराम जाधव यांचा समावेश आहे. संघाचे व्यवस्थापक म्हणून अकिल शेख व मार्गदर्शक योगिता तनपुरे जबाबदारी सांभाळत आहे.

पेन्शनर्सच्या शहराध्यक्षपदी देशमुख

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– राष्ट्रीय संघर्ष समिती (ईपीएस ९५) नगर शहर कार्याध्यक्षपदी त्रिंबकराव उर्फ बाळासाहेब देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली. शहरात झालेल्या राष्ट्रीय संघर्ष समितीच्या बैठकीत त्यांच्या नियुक्तीची घोषणा करण्यात आली. देशातील विविध खाजगी व शासकीय औद्योगिक क्षेत्रातील सुमारे ७८ लाख पेन्शन धारकांच्या पेन्शन वाढीसाठी गेले आठ ते नऊ वर्षापासून देशभरात संघटना कार्यरत आहे. शहरात झालेल्या बैठकीत देशमुख यांच्या नावाची सूचना संघटनेचे पश्चिम भारत संघटक सुभाषराव पोखरकर यांनी मांडली. त्यास अमित घाडगे महाराष्ट्राचे प्रांतीक संघटक यांनी अनुमोदन दिले. सभेच्या अध्यक्षपदी महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष आप्पासाहेब वाळके होते. याप्रसंगी दिलीप कहाने, राजगुरु, संपतराव समिंदर, आशाताई शिंदे, प्रकाश गायके, भिमराव भिसे, डॉ. गाडेकर, प्रकाश मुरुमकर, शिवाजी थोरात, महादेव शिंदे, बबनराव खामकर आदी उपस्थित होते.

केडगाव खूनप्रकरण उलगडले, मृताची ओळख पटली

तीन संशयित आरोपी एलसीबीकडून गजाआड

अहिल्यानगर (प्रतिनिधी) – केडगाव औद्योगिक परिसरात २२ जून रोजी आढळलेल्या अनोळखी मृतदेहाच्या प्रकरणात पोलिसांनी तात्काळ तपास करून मयताची ओळख पटवत, तिघा संशयित आरोपींना अटक केली आहे. या हत्येचा तपास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अतिशय कौशल्याने करून खूनाचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

२२ जून रोजी नागछाप हिंग कंपनीजवळील मोकळ्या जागेत अनोळखी इसम रक्तबंबाळ अवस्थेत सापडला होता. गंभीर मारहाणीचे वळ व जखमा पाहता, प्राथमिकतः हा खून असल्याचा संशय पोलिसांना आला होता. त्यानंतर अनोळखी इसमाला उपचारासाठी जिल्हा रूग्णालयात पाठवले असता डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले. कोतवाली पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती. मात्र, वैद्यकीय अहवाल व पंचनाम्यानंतर स्पष्ट झाले की सदर इसमाचा निर्घृण खून झाला आहे. त्यामुळे कोतवाली पोलीस ठाण्यात खून, पुरावा नष्ट करणे आदी कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेची दखल घेत पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांनी घटनास्थळी भेट

देत तपासाची जबाबदारी स्थानिक गुन्हे शाखेला दिली. पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक तुषार धाकराव व त्यांच्या पथकातील अंमलदार शाहीद शेख, संदीप पवार, फुरकान शेख, विजय ठोंबरे, रवींद्र घुंगासे, मयुर गायकवाड, भगवान थोरात, विशाल तनपुरे, प्रशांत राठोड, मेघराज कोल्हे, भगवान धुळे यांनी घटनास्थळाजवळील २० ते २५ सीसीटीव्ही फुटेज तपासले. तांत्रिक विश्लेषणाव्दारे तीन संशयितांची ओळख पटली. यामध्ये संदेश संजय क्षेत्रे (वय २५, रा. भुषणनगर), अमन असिरमिया शेख (वय २३, रा. शिवाजीनगर) व मंगेश कालीदत्त कांबळे (वय २१, रा. भुषणनगर) यांचा समावेश आहे. २४ जून रोजी सर्व संशयित आरोपींना केडगाव परिसरातून ताब्यात घेण्यात आले. संशयित आरोपी मंगेश कांबळे याच्याकडून मृत व्यक्तीचे आधार कार्ड सापडले. त्यावरून मृत इसमाची ओळख बोबडा अनारसिंग (रा. सुखपुरी, जैनाबाद, बुरहानपूर, मध्यप्रदेश) अशी असल्याचे समोर आले.

लुटमारसाठी हत्या

पोलीस तपासात संशयित आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यांच्या सांगण्यानुसार २२ जूनच्या मध्यरात्री संशयित आरोपी पुणे बसस्थानकाजवळून केडगावकडे जात असताना रस्त्यालगत उभ्या असलेल्या बोबडा अनारसिंग याला मोपेडवर जबरीने बसवून औद्योगिक परिसरात नेले. त्याला लुटण्यासाठी मारहाण करत त्याच्याजवळील बॅग, पैसे व एटीएम कार्ड हिसकावले. एटीएम पिन विचारून संदेश क्षेत्रेने पैसे काढण्याचा प्रयत्न केला, मात्र पिन चुकीचा असल्याने पैसे निघाले नाहीत. त्यामुळे संतापलेल्या संशयित आरोपींनी लाकडी काठी व दगडाने जबर मारहाण करत त्याचा खून केला.

चार्टर्ड अकाउंटंट्सकडून व्यावसायिकाची फसवणूक

जीएसटी भरणा न करता खोट्या प्रमाणपत्रांची उघड

अहिल्यानगर (प्रतिनिधी) – गंजबाजार परिसरातील 'सूर्या हॉलमार्किंग्स' च्या व्यावसायिकाची ३८ लाख रूपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी तिघा जणांविरोधात कोतवाली पोलीस ठाण्यात मंगळवारी (२४ जून) दुपारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राजेश भोसले (वय ४४, रा. गजराज टॉवर, सारसनगर) असे फसवणूक झालेल्या व्यावसायिकाचे नाव आहे. त्यांनी दाखल केलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे, त्यांनी शेंगा गल्ली, गंजबाजार येथे सोन्याच्या दागिन्यांचे हॉलमार्किंग व्यवसाय सुरू केला होता. २०२१ पासून त्यांनी फर्मसाठी आवश्यक असलेले जीएसटी व इन्कम टॅक्स प्रक्रिया करण्यासाठी सीए सचिन दुधाडे व देवेंद्र पाटील यांच्यावर विश्वास ठेवून काम दिले होते. दुधाडे व पाटील यांनी एसपी असोसिएट्स व एसडी असोसिएट्स या नावाने काम करत असल्याचे सांगितले. त्यांनी पुणे व सातारा येथे ऑडिट ऑफीसेस असल्याचा बनाव करत, विविध बँका व कंपन्यांचे कर सल्लागार असल्याचेही सांगून भोसले यांच्याकडून जीएसटी व इन्कम टॅक्स भरण्याच्या नावाखाली वेळोवेळी १८ लाख ३१ हजार २९९ रूपये उकळले. यानंतर, सोनाली लोणकर या महिलेला अर्णव एंटरप्रायझेस नावाने भागीदारी फर्म दर्शवून पुण्यातून कर प्रक्रिया चालेल असे सांगण्यात आले. त्यानंतर आणखी १ लाख ५० हजार रूपये रोख स्वरूपात घेतले गेले. दरम्यान, २०२२-२३ व २०२३-२४ चे ऑडिट रिपोर्ट, जीएसटी प्रमाणपत्रे, चलने हे सर्व खोटे व बनावट होते, जे जीएसटी कार्यालयात तपासणी दरम्यान भोसले यांना समजले. भोसले यांनी जेव्हा ही कागदपत्रे सीए किरण भंडारी यांना तपासण्याकरिता दिली, तेव्हा त्यांनी त्याची खात्री केली असता संबंधित फर्मचे कोणतेही जीएसटी भरणे झालेच नव्हते. त्यामुळे आता शासनाकडून ३८ लाख रूपये दंडासहित वसूल होण्याची शक्यता आहे. या संपूर्ण फसवणूक प्रकरणी भोसले यांनी पोलिसात दिलेल्या फिर्यादीवरून सचिन दुधाडे (रा. माहेश्वरी पार्क, भिस्तबाग महाल), देवेंद्र पाटील (रा. यशोदासागर, पाईपलाईन रस्ता) व सोनाली लोणकर (पूर्ण नाव, पत्ता माहिती नाही) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वादातून शेतकऱ्याला रॉडने मारहाण

कापुरवाडीतील घटना; सात जणांविरुध्द गुन्हा

अहिल्यानगर (प्रतिनिधी) – कापुरवाडी (ता. अहिल्यानगर) येथे किरकोळ वादातून सात जणांच्या जमावाने एका शेतकऱ्याला लोखंडी रॉडने मारहाण करून जखमी केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात सोमवारी (२३ जून) सात जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अनिल पोपट भगत (वय ४१, रा. महादुक सेंटर, कापुरवाडी) यांनी फिर्याद दिली आहे. १३ जून रोजी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास कापुरवाडी येथे राजु हिरामण निकम याच्या टपरीसमोर वाद निर्माण झाला. लाईटच्या वायर तुटल्याच्या कारणावरून वाद विकोपाला गेला आणि गैरकायद्याची मंडळी जमून फिर्यादीला दमदाटी करत लोखंडी रॉडने डोक्यात मारहाण केली. या घटनेत राजु हिरामण निकम, संदीप हिरामण निकम, हिरामण रेवजी निकम, अनिल भाऊराव पवार, ऋतिक अनिल पवार, गहिनीनाथ जाधव आणि लखन सुरेश माळी (सर्व रा. कापुरवाडी) या सात संशयित आरोपींचा समावेश आहेत. जखमी अनिल भगत यांना उपचारासाठी खासगी रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. प्रकृती स्थिर झाल्यानंतर त्यांनी २३ जून रोजी पोलीस ठाण्यात हजर होऊन फिर्याद दिली. पोलीस अंमलदार दत्तात्रय मोरे तपास करीत आहेत.

नाव वगळण्याचा अहवाल अमान्य करण्याच्या आदेशाला स्थगिती

जिल्हा न्यायालयाचा निर्णय; अपहार प्रकरणात डॉ. बोरगेंना दिलासा

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– महापालिकेच्या आरोग्य विभागातील साडेसोळा लाखांच्या अपहारप्रकरणी दाखल गुन्ह्यातून वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.अनिल बोरगे यांचे नाव वगळण्याचा अहवाल अमान्य करण्याच्या आदेशाला प्रधान जिल्हा न्यायाधीश अंजू शेंडे यांनी स्थगिती दिली आहे. या प्रकरणी पुढील सुनावणी १७ जुलै रोजी होणार आहे. डॉ. बोरगे यांनीच हा प्रकार ११ फेब्रुवारी २०२३ रोजी आयुक्तांच्या निदर्शनास आणला होता, असा दावा न्यायालयात करण्यात आला आहे.

आरोग्य विभागातील अपहार प्रकरणी राष्ट्रीय आरोग्य अभियानचे शहर लेखा व्यवस्थापक विजयकुमार रणदिवे व वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. बोरगे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोग्य विभागाचे प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर यांनी याप्रकरणी फिर्याद दिलेली आहे. त्यानंतर दोघांना अटकही करण्यात आली होती. या गुन्ह्याच्या तपासात पोलिसांना गुन्ह्यात डॉ. बोरगे यांचा सहभाग आढळून आला नाही. डॉ. बोरगे यांच्यावर आरोपपत्र दाखल करण्याइतपत पुरावा नाही, असा अहवाल न्यायालयात सादर करण्यात आला होता. या अहवालावर न्यायालयात सुनावणी होऊन डॉ. बोरगे यांचे नाव वगळण्याचा अहवाल अमान्य करण्यात आला होता. या आदेशानंतर डॉ. बोरगे यांनी ॲड. एस. बी. बाफना यांच्यामार्फत सत्र न्यायालयात रिव्हिजन याचिका दाखल केली. त्यावर मंगळवारी सुनावणी झाली. अधिकाराचा गैरवापर करून पैसे खर्च केल्याच्या गैरप्रकाराची माहिती बोरगे यांनी ११ फेब्रुवारी २०२३ रोजी आयुक्तांना दिली होती. त्यावर सदरची रक्कम वसूल करण्याचे आदेशही देण्यात आले होते, असा दावा न्यायालयात करण्यात आला. त्यानंतर न्यायालयाने अहवाल अमान्य करण्याच्या आदेशाला स्थगिती दिली आहे.

रेखा जरे हत्याप्रकरणातील आरोपीचा जल्लोष!

जेलबाहेर फटाके, रॅली, घोषणाबाजी; ७० ते ८० जणांवर गुन्हा दाखल

अहिल्यानगर (प्रतिनिधी) – बहुचर्चित रेखा जरे हत्या प्रकरणातील संशयित आरोपी सागर भिंगारदिवे (रा. केडगाव) याला जामीन मिळताच, त्याने कायद्याची भीती न बाळगता जेलबाहेर बेकायदेशीर मिरवणूक काढून शहरात दहशत निर्माण केली. शहरातील जिल्हा कारागृह ते केडगाव वेसपर्यंत मिरवणूक काढून घोषणाबाजी केली, फटाके वाजवत बेदरकारपणे वाहने चालवून वाहतुकीस अडथळा निर्माण केला.

दरम्यान, या प्रकरणी पोलिसांनी सोमवारी (२३ जून) रात्री कोतवाली पोलीस ठाण्यात सागर भिंगारदिवेसह त्याच्या ७० ते ८० अनोळखी साथीदारांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अंमलदार अनुप झाडबुके यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, सागर भिंगारदिवे याने कारागृहाबाहेर फटाके फोडत, कार्यकर्त्यांच्या खांद्यावर बसून घोषणाबाजी करत मोठा जमाव जमवला. पांढऱ्या व काळ्या रंगाच्या स्कॉर्पिओ, फॉर्च्युनर, स्विफ्ट कार, दुचाक्यांचा ताफा घेऊन केडगाव वेसपर्यंत मिरवणूक काढण्यात आली. सदर प्रकाराचा व्हिडीओ व ऑडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, संशयित आरोपी व त्याचे समर्थक सार्वजनिक ठिकाणी आरडाओरडा, घोषणाबाजी, व फटाके फोडत वाहतुकीस अडथळा निर्माण करत होते. यामुळे समाजात दहशत निर्माण करण्याचा उद्देश स्पष्टपणे दिसून येत असून वाहतुकीस अडथळा निर्माण झाला, तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी जारी केलेल्या जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करण्यात आले असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. पोलिसांची गुन्हा दाखल करून चौकशी सुरू असून, मिरवणुकीतील व्हिडीओ आणि वाहनांची तपासणी करून अधिक संशयित आरोपींची ओळख पटवली जात आहे.

कांद्याच्या बियाणांची पेटी लांबविली

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– चालू वाहनामधून अज्ञात चोरट्याने दोरीची जाळी बाजूला करून कांद्याच्या बियाणाची ३७ हजार ५०० रूपये किंमतीची पेटी चोरी केल्याची घटना १८ जून रोजी दुपारी तारकपूर बस स्टँडजवळ घडली आहे. या घटनेबाबत तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नवनाथ भिमराव धाने (वय २९, रा. दिवटे बोधेगाव, ता. शेवगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी नवनाथ हे पिकअप (एमएच १६ सीसी ७५८८) चालवत असून ते दीड वर्षांपासून या वाहनावर चालक म्हणून कार्यरत आहेत. १८ जून रोजी त्यांनी बोधेगाव येथील भारत कृषी सेवा केंद्रातून कांद्याच्या बियाणाच्या ३५ पेट्यांची मालवाहतूक सुरू केली. यापैकी २५ पेट्या त्यांनी अहिल्यानगर येथील विविध पाच ठिकाणी पोहोचवल्या. उर्वरित १० पेट्या वाहनात ठेवून त्यांनी वाहन बांधले होते आणि तारकपूर बस स्टॅण्डमार्गे पत्रकार चौकाकडे जात होते. दरम्यान, तारकपूर बस स्टॅण्डसमोर वाहतूक कोंडीमुळे वाहनाचा वेग कमी असताना एका दुचाकीवर आलेल्या दोन व्यक्तींनी त्यांना वाहनातून पेटी चोरी गेल्याचे सांगितले. त्यांनी वाहन थांबवून पाहणी केली असता वाहनामागील दोरीची जाळी बाजूला केलेली दिसली आणि एक पेटी गायब असल्याचे लक्षात आले. या चोरी प्रकरणी नवनाथ यांनी २३ जून रोजी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

श्रीरामपूर, नेवासा शाखेत पैसे गुंतले; कागदपत्रांसह संपर्क साधा

ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या गुंतवणूकदारांना पोलिसांचे आवाहन

अहिल्यानगर (प्रतिनिधी) – ज्या गुंतवणूकदारांनी ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑप. क्रेडिट सोसायटी बीडच्या श्रीरामपूर किंवा नेवासा शाखांमध्ये पैसे गुंतवले असून अद्याप आपली रक्कम परत मिळालेली नाही, अशा नागरिकांनी गुंतवणुकीचे संपूर्ण कागदपत्रांसह आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय, अहिल्यानगर येथे त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन सहायक पोलीस निरीक्षक युवराज आठरे यांनी केले आहे.

ज्ञानराधा मल्टीस्टेटमधील अपहारप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक मंडळ, शाखा मॅनेजर, कर्मचारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व कॅशियर यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गुन्हा २९ जुलै २०२४ रोजी नोंदविण्यात आला असून त्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे. ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या शाखांनी नागरिकांना आकर्षक व्याजदरांची जाहीरात करून विविध योजना जसे की बचत खाती, चालू खाती, मुदत ठेव व आवर्ती ठेव योजनांमध्ये पैसे गुंतवण्यास प्रवृत्त केले. मात्र, ठेवीची मुदत संपल्यानंतरही गुंतवणूकदारांना त्यांचे पैसे परत मिळाले नाहीत. सदर गुन्ह्याचा तपास सहायक पोलीस निरीक्षक आठरे यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे. पोलिसांनी सदर प्रकरण गंभीरतेने घेतले असून जास्तीत जास्त गुंतवणूकदारांनी पुढे येऊन तक्रारी नोंदवाव्यात, जेणेकरून आरोपींविरूध्द ठोस कारवाई करता येईल, असेही आवाहन करण्यात आले आहे.

स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समुळे क्रीडाक्षेत्राला बळकटी मिळणार

आ. संग्राम जगताप : पहिले अद्यावत स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स लवकरच पुर्णत्वास

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– राज्य सरकार कडून मिळवलेल्या निधीतून शहरात दोन अद्यावत स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे कामे प्रगतीपथावर आहेत. यातील सारसनगर येथील स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे काम जवळपास पूर्णत्वास आलेले असून लवकरच खेळाडूंसाठी उपलब्ध होणार आहे. या स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समुळे क्रीडाक्षेत्राला अधिक चालना व बळकटी मिळणार असून खेळाडूंची चांगली सोय होणार आहे, अशी माहिती आ. संग्राम जगताप यांनी दिली.

आ. जगताप यांच्या प्रयत्नातून अहिल्यानगर शहरात सारसनगर व गंगा उद्यान परिसरात असे दोन अद्यावत भव्य स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स उभारण्यात येत आहेत. मंगळवारी आ. जगताप यांनी सारसनगर येथील स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या कामाची पाहणी करून साईट इंजिनिअर व मनापा अभियंत्यांना सूचना केल्या. यावेळी माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, प्रा. माणिक विधाते, सुरेश बनसोडे, वैहाव ढाकणे, मनापा अभियंता श्रीकांत निंबाळकर आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते. आ.जगताप म्हणाले, शहरातील वाडिया पार्क क्रीडा संकुलचा विकास झाला नसल्याने शहरातील खेळाडू चांगल्या सुविधांपासून वंचित आहेत. त्यामुळे राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठवून व पाठपुरावा करून शहरात दोन अद्यावत स्पोर्ट्स कॉम्प्लेक्ससाठी निधी उपलब्ध केला. सर्व क्रीडा संघटनांना बरोबर घेत या स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे काम सुरु केले आहेत. सारसनगरमधील या स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये इनडोअर खेळांसाठी दोन एकर जागेत दोन मजली इमारत उभारण्यात येत आहे. तळमजल्यावरील बॅडमिंटन हॉलमध्ये दोन बॅडमिंटन कोर्ट, टेबल टेनिस हॉल, स्वागत कक्ष प्रशासकीय काया--लय, प्रशिक्षक रूम, खेळाडूंसाठी चेंजिंग रूम. पहिल्या मजल्यावर सुमारे १०० प्रेक्षकांची क्षमता असलेली प्रेक्षक गॅलरी, तसेच विविध खेळांसाठी सराव हॉल देखील आहेत. तसेच व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, टेनिस, कबड्डी कोर्ट, बॉक्स क्रिकेट, योगा आणि झुम्बासाठी जागा व बाहेरील मैदानात भव्य जॉगिंग ट्रक अशी रचना असणार आहे, अशी माहिती रोहित साळुंके यांनी दिली.

आणीबाणीत लढा देणाऱ्यांचा होणार सन्मान

बंदिवान यांच्या माहितीचे सचित्र प्रदर्शन

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– १९७५ ते १९७७ मधील आणीबाणीच्या कालावधीत अहिल्यानगर जिल्ह्यातील ज्या व्यक्तींना कारावास सोसावा लागलेल्या व्यक्तींचा आज बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालय येथे सन्मान करण्यात येणार असल्याची जिल्हा प्रशासनामार्फत देण्यात आली आहे.

देशात १९७५ ते १९७७ मध्ये लागलेल्या आणीबाणी कालावधीत लढा देताना अहिल्यानगर जिल्ह्यातील व्यक्तींनी मिसा कायद्याखाली कारावास भोगलेला आहे. अशा व्यक्तींना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वाक्षरीचे सन्मानपत्र देवून यथोचित गौरव करण्याचे शासनाने ठरविले आहे. जिल्ह्यातील या व्यक्तींचा जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या हस्ते सन्मान करण्यात येणार आहे. याच अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांच्या हस्ते या सचित्र माहिती प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. प्रदर्शनात आणीबाणीच्या अनुषंगाने जिल्ह्यात घडलेल्या विविध घटना-घडामोडींची तसेच आणीबाणीविरोधी संघर्षात सहभागी झालेल्या विविध कार्यकर्ते-नागरिकांची छायाचित्रे व माहितीचा समावेश असणार आहे. या प्रदर्शनास उपस्थित राहण्याचे आवाहनही केले आहे.